# जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर
## ( नगरविकास शाखा )
सिध्देश्वर पेठ, सोलापूर-४१३ ००३

दुरध्वनी क्रं. ०२१७-२६२०१३३ dposolapur@gmail.com

---

क्रं.२०२१/नवि-५/आरआर- ५९८ दि. २८/१२/२०२१

निवडणूक /तात्काळ

प्रति,

मा.व्यवस्थापक,
दैनिक लोकमत

विषय - नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२१
सोलापूर जिल्हयातील माढा ,माळशिरस , महाळुंग-श्रीपूर,वैराग व नातेपुते नगरपंचायतीच्या ना.मा.प्र.व ना.मा.प्र.महिलांच्या आरक्षणामधील बदलाबाबतचे शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ - मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन,पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र.नपाप्र/१/नामाप्रआ/अंतिम/कावि/१२४८/२०२१ दिनांक २७.१२.२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन , सोलापूर जिल्हयातील माढा ,माळशिरस , महाळुंग-श्रीपूर,वैराग व नातेपुते नगरपंचायतमधील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांच्या आरक्षणामधील बदलाबाबतचे शुध्दीपत्रक यासोबत जोडले आहे. सदरचे शुध्दीपत्रक आपले दैनिक वृत्तपत्राच्या दिनांक २९.१२.२०२१ रोजीच्या आवृत्तीमध्ये प्रसिध्द करणेत यावी व सदर वृत्तपत्राच्या ४ प्रतीसह आपले देयक संबंधित नगरपंचायत कार्यालयाकडे सादर करावे.

जिल्हाधिकारी सोलापूर सत्यमेव जयते

(मिलिंद शंभरकर भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी सोलापूर

PTO

Scanned with CamScanner

प्रत -१) मा.राष्ट्रीय सूचना विज्ञान अधिकारी, सोलापूर

२/- यांना सोलापूर जिल्हयातील माढा ,माळशिरस , महाळुंग-श्रीपूर,वैराग व नातेपुते नगरपंचायतमधील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांच्या आरक्षणामधील बदलाबाबतचे शुध्दीपत्रक जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर च्या अधिकृत संकेतस्थळावर दिनांक २८.१२.२०२१ ते दिनांक २०.१२.२०२१ अखेर प्रसिध्द करावे.

२) हुजूर रेकॉर्ड किपर, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

२/- सोबतचे शुध्दीपत्रक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून त्याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करणेकामी.

Scanned with CamScanner

## सोलापूर जिल्हयातील माढा ,माळशिरस , महाळुंग-श्रीपूर,वैराग व नातेपुते नगरपंचायतीच्या नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांच्या आरक्षणामधील बदलाबाबतचे शुध्दीपत्रक

सोलापूर जिल्हयातील माढा ,माळशिरस , महाळुंग-श्रीपूर,वैराग व नातेपुते नगरपंचायतींची अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना (परिशिष्ट-७ अ व ७-ब) दि.२६.११.२०२१ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-पुणे मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापि मा.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील आदेश क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.६/का-०६/दि.१७.१२.२०२१ अन्वये उक्त नगरपंचायतीमधील ना.मा.प्र.व ना.मा.प्र.महिलांचे आरक्षण अनारक्षित करुन त्या जागा सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्यात याव्यात असे निर्देश दिलेले आहेत. व मूलत: ना.मा.प्र.साठी आरक्षित असलेल्या ज्या जागा सार्वसाधारण प्रवर्गाचे होतील त्या जागापैकी सर्वसाधारण महिलाकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागा या आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या तत्त्वावर कोणत्या प्रभागात देय होतील त्याबाबत आरक्षण सोडत काढण्याचे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार उक्त नगरपंचायतीनी दि.२३.१२.२०२१ रोजी आरक्षण सोडत काढून अंतिम मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग पुणे यांचेकडे सादर केला होता. त्यास मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन पुणे विभाग पुणे यांनी त्यांचेकडील आदेश क्र.नपाप्र/०१/नामाप्रआ/अंतिम/कावि-१२४८/२०२१ दि.२७.१२.२०२१ अन्वये अंतिम मान्यता दिलेली आहे व त्यानुसार उक्त नगरपंचायतमधील ना.मा.प्र. व ना.मा.प्र.महिलांच्या आरक्षणमधील बदलाबाबचे शुध्दीपत्रक खालीलप्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० अन्वये नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नगरपंचायतीचे नांव | दि.१२.११.२०२१ रोजी माढा व महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे व दि.१५.११.२०२१ रोजी माळशिरस,वैराग व नातेपुते नगरपंचायतीतील निश्चित केलेल्या आरक्षणाच्या संबंधित ना.मा.प्र.साठीचे प्रभाग क्रमांक | दि.१२.११.२०२१ रोजी माढा व महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे व दि.१५.११.२०२१ रोजी माळशिरस,वैराग व नातेपुते नगरपंचायतीतील निश्चित केलेले आरक्षण | दि.२३.१२.२०२१ रोजी आरक्षण सोडतीव्दारे निश्चित झालेले आरक्षण व मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक पुणे विभाग पुणे यांनी अंतिम मान्यता दिलेले आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | माढा | ५ | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण (महिला) |
| | | ७ | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण (महिला) |
| | | ९ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण |
| | | १४ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण |
| २ | माळशिरस | २ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण |
| | | ५ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण |
| | | ८ | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण (महिला) |
| | | १० | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण (महिला) |

जिल्हाधिकारी सोलापूर सत्यमेव जयते

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | महाळुंग-श्रीपूर | ३ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण (महिला) |
| | | ७ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण |
| | | १४ | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण (महिला) |
| | | १५ | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण |
| ४ | वैराग | ३ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण (महिला) |
| | | ९ | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण |
| | | १० | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण |
| | | १५ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण (महिला) |
| ५ | नातेपुते | ७ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण (महिला) |
| | | ८ | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण |
| | | ९ | ना.मा.प्र. | सर्वसाधारण |
| | | १० | ना.मा.प्र.(महिला) | सर्वसाधारण (महिला) |

टिप - सदर प्रभागांचे फक्त आरक्षणामध्ये बदल ( ना.मा.प्र. व ना.मा.प्र.महिलाच्या आरक्षण ऐवजी सर्वसाधारण/सर्वसाधारण महिला ) झालेला असून प्रभागांची लोकसंख्या व्याप्ती व चुत:सिमा यामध्ये काहीही बदल झालेला नाही.

जिल्हाधिकारी सोलापूर सत्यमेव जयते

( मिलिंद शंभरकर भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी सोलापूर

Scanned with CamScanner